आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी केंद्रीय मंत्रीमंडळानं स्वीकारल्या, देशभरात सहमती निर्माण करुन २ टप्प्यात अंमलबजावणी होणार
- शेतकऱ्यांचं उत्पन्न निश्चित करणं, रबी हंगामासाठी खतांवर पोषणमूल्य आधारित अनुदान आणि ६३ हजार गावातल्या आदिवासींचं जीवनमान उंचावण्यासाठीच्या योजनांनाही केंद्र सरकारची मंजुरी
- यंदाच्या खरीप हंगामात राज्यात कृषी उत्पन्न ३१ लाख मेट्रीक टनांनी वाढण्याची आशा

**आणि**

- चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मालविका बनसोडची पॅरिस ऑलिम्पिकमधल्या कांस्य पदक विजेत्या चीनी खेळाडूवर मात

**<><><><><>**

एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातल्या उच्च स्तरीय समितीच्या शिफारशी केंद्रीय मंत्रीमंडळानं आज स्वीकारल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या संदर्भातल्या विविध कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यावर याची अंमलबजावणी कधीपासून करायची याची तारीख निश्चित होईल, पण सरकारच्या याच कार्यकाळात याची अंमलबजावणी सुरू होईल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कालच स्पष्ट केलं असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

**होल्ड - अश्विनी वैष्णव (२७ सेकंद)**

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गेल्यावर्षी स्थापन केली होती. समितीकडे आलेल्या ८० टक्के प्रतिक्रिया या प्रस्तावाच्या बाजूनं होत्या. बहुतांश राजकीय पक्षांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली होती, असं वैष्णव म्हणाले. समितीच्या शिफारशींवर आता देशभरात मोठ्या प्रमाणात विस्तारानं चर्चा होईल आणि सहमती निर्माण केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. केंद्रीय मंत्रीमंडळातल्या इतर महत्त्वाच्या निर्णयांविषयी ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - व्हाइस कास्ट**

*(पीएम आशा अर्थात पीएम अन्नदाता उत्पन्न संरक्षण अभियान सुरू ठेवायला केंद्रीय मंत्रीमंडळाची आज मंजुरी मिळाली. दाळी, तेलबियांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासह किमान आधारमूल्य आणि बाजार भाव यातल्या फरकाची भरपाई शेतकऱ्यांना दिली जाईल. तसंच शेतकऱ्यांचं उत्पन्न सुरक्षित ठेवणं, ग्राहकांसाठी बाजारभाव स्थिर ठेवणं यावर यात भर दिला आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या कार्यकाळात यासाठी ३५ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.*

*रबी हंगामाकरता २४ हजार ४७५ कोटी रुपयांच्या पोषण मूल्य आधारित खतांच्या सबसिडीला केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. फॉस्फेट आणि पोटॅश आधारित ही खतं आहेत. यामुळं शेतकऱ्यांना सवलतीत, परवडणाऱ्या दरात आणि वाजवी किंमतीत खतं मिळतील, असं वैष्णव यांनी सांगितलं.*

*प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता मिळाली. पायाभूत सुविधा विस्तारणे, आर्थिक सक्षमीकरण, दर्जेदार शिक्षण*

*आणि आरोग्य सुविधा याअंतर्गत दिल्या जाणार आहेत. सुमारे साडे पाचशे जिल्ह्यातल्या ६३ हजार गावातल्या ५ कोटींहून अधिक आदिवासींना याचा फायदा होईल.*

*चंद्रयान ४ मोहिम, शुक्र मोहिम आणि सुधारित गगनयान मोहिम, तसंच भारतीय अंतराळ स्थानकाच्या स्थापनेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. २०४० मध्ये चंद्रावर मानव पाठवण्यासाठी आवश्यक तयारी करणे, त्यासाठी यान चंद्रावर उतरवणे आणि त्यानंतर त्याला पृथ्वीवर परत आणणं या चंद्रयान ४ मोहिमेचा भाग आहे. यासाठी आवश्यक स्वदेशीची बनावटीचं अंतराळ यानाच्या निर्मितीलाही सरकारनं मंजुरी दिली.*

*Animation, Visual Effects, Gaming, Comics आणि Extended Reality या क्षेत्रातलं राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र स्थापन करायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मान्यता दिला. या क्षेत्रातल उत्कृष्ट प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिलं जाईल. )*

**<><><><><>**

उद्योजकांना सर्व सुविधा पुरवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून हे राज्य आता उद्योगस्नेही झालं आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या पहिल्या सेमी कंडक्टर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन आज नवी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्यात उद्योग क्षेत्राला रेड कार्पेट सुविधा तसंच एक खिडकी योजना असल्यामुळे राज्यात उद्योग क्षेत्र विकसित होत असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

केंद्र सरकारच्या मदतीने स्वतःची इको सिस्टम तयार करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य बनल्याचं उपमुख्यमंत्री देेवेंद्र फडणवीस म्हणाले. तर या प्रकल्पातून

४ हजार रोजगार निर्माण होणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयांतर्गत विशेष वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात सामुदायिक आरोग्य शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. या आरोग्य शिबिरात राज्यभरातल्या दीड हजार रुग्णालयांचा समावेश असेल. झोपडपट्ट्यांमध्ये, वाड्यावस्त्यांवर २५ हजारांहून अधिक शिबिरं आयोजित केली असून सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्य तपासण्या करण्याचे ध्येय निर्धारित केलं आहे.

**<><><><>**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामातलं धान्य उत्पादन सरासरीच्या तुलनेत सुमारे ३१ लाख मेट्रीक टनानं वाढण्याची अपेक्षा कृषी विभागाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी व्यक्त केली. राज्यातल्या खरीप हंगामातल्या पिकांना पावसानं दिलेली योग्य साथ आणि अनुकूल हवामानामुळं यंदाचं खरिपातील धान्योत्पादन चांगलं येण्याची आशा आहे. खरीप हंगामाचा पहिला अंदाज हाती आला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

चीन खुली बॅडमिंटन BWF Super 1000 स्पर्धेत आज महिला एकेरीत भारताच्या मालविका बनसोडनं पॅरिस ऑलिम्पिकमधल्या कांस्य पदक विजेत्या ग्रेगोरिया तुंजूंग वर मात केली. तिनं २६-२४, २१-१९ अशा सरळ सेट्समधे ग्रेगोरियाला पराभूत केलं. आजच्या इतर सामन्यांमधे मात्र भारतीय खेळाडूंना

चमकदार कामगिरी करता आली नाही. एकेरीत आकर्षी कश्यप, समीया इमाद फारुखी तर दुहेरी त्रिसा ज्यॉली आणि गायत्री गोपीचंद तसंच मिश्र दुहेरीत एन सिक्कीरेड्डी आणि बी सुमीत रेड्डी पराभूत झाले.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं छावणी भागात महिला आणि बालकांसाठी १०० खाटांचं रुग्णालय सुरू करण्यात आलं आहे. या रुग्णालयात महिला आणि बारा वर्षापर्यंतच्या सर्व मुलांवर आधुनिक पद्धतीनं उपचार केले जातील, तसंच रुग्णांच्या नातेवाईकांसाठी शिवभोजन व्यवस्था करण्यात आल्याचं पालकमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

गणेशविसर्जनानंतर विविध चौपाट्या, समुद्रकिनाऱ्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती. या मोहिमेद्वारे दोन दिवसांत ३६३ मेट्रिक टन घन कचरा संकलित करण्यात आला. तसंच, सार्वजनिक आणि कृत्रिम विसर्जनस्थळांवरचं निर्माल्य गोळा करण्यासाठी यंदा महानगरपालिकेनं ५०० निर्माल्य कलश आणि ३५०पेक्षा जास्त वाहनं उपलब्ध करून दिली होती. त्यातून सुमारे ५५० मेट्रिक टन निर्माल्य संकलित झालं असल्याची माहिती महानगरपालिकेनं दिली आहे. हे निर्माल्य ३७ सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्पांमध्ये पाठवण्यात आलं असून येत्या महिन्याभरात त्याचं सेंद्रीय खत तयार होईल.

<><><><><>

पुणे शहरात एकंदर तीन लाख ७४ हजार १४८ गणेश मूर्ती विसर्जित करण्यात आल्या. पुणे महापालिकेतर्फे गणेश विसर्जनासाठी बांधण्यात आलेल्या

४५  हौदांमध्ये एक लाख १ हजार २८१ मूर्तींचं तर ५१६ लोखंडी टाक्यात एकंदर दोन लाख ८२ हजार ६०४ मूर्तींचं विसर्जन करण्यात आलं. महापालिकेनं मूर्ती दान करण्यासाठी केलेल्या आवाहनाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून २३९ ठिकाणी उभारलेल्या मूर्ती संकलन केंद्रात एक लाख ७६ हजार ६७ मुर्ती दान करण्यात आल्या आहेत. घनकचरा विभागाचे प्रमुख आणि महापालिकेचे उपायुक्त संदीप कदम यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

**<><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून धमकी दिल्याबद्दल भाजपा खासदार अनिल बोंडे यांच्याविरोधात अमरावतीच्या राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचं काँग्रेसच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

राहुल गांधी यांना इजा पोहचवण्याच्या धमक्या देणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. या मागणीसाठी काँग्रेस उद्या राज्यभर रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

**<><><><>**

‘पोलाद क्षेत्रात हरितक्रांती- शाश्वत नवोन्मेष’ या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन केंद्रीय पोलाद राज्यमंत्री भूपती राजू श्रीनिवास वर्मा यांच्या हस्ते आज मुंबईत झालं. या कार्यक्रमाला संबोधित करताना वर्मा यांनी स्टील क्षेत्रात शाश्वत कार्यपद्धती आणि नवनिर्मितीवर भर देण्याचं महत्त्व अधोरेखित केलं.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता  हवामान विभागानं व्यक्त केली आहे.